**PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION**
**JAGADGURU SANT TUKARAM MAHARAJ SANTPITH**
**SCHOOL & JR. COLLEGE**
Patilnagar, Talgaon Chikhali, Pune - 411062
Affiliation No: 1120131 School Code: 32147 UDISE CODE: 27252000538
Contact No: 9022816058 E-mail: santpithschool@gmail.com

जा.क्र.संतपीठ/स्कूल/०१/कावि/ ५६/२०२६-२०२७ दिनांक - २२/०६/२०२६

**कामाचे नाव :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रवर्तित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ व अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "गांधर्व मंच" स्पर्धेच्या कार्यक्रमास उपस्थित व्यक्तींना भोजन पुरवठा करणेबाबत...

**प्रति,**
मा.----------------------
------------------------

## कोटेशन नोटीस क्र. ०८/२०२६ - २०२७

जगदगुरु संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळा, संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा संजीवन समाधी सोहळा तसेच अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचा १२५ वा वर्धापन दिन सोहळा या तीन सोहळ्याचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रवर्तित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ, पाटीलनगर, टाळगाव चिखली, पुणे व अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "गांधर्व मंच" या आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेस व सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास उपस्थित प्रमुख अतिथी, मान्यवर, परीक्षक, स्पर्धक व जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांस भोजन पुरवठा करणेकामी सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे....

| अ.क्र | भोजन ताट तपशील | नग संख्या | दर प्रति भोजन ताट (वाहतूक खर्च व सर्व करासहीत) |
|---|---|---|---|
| १. | **शाहाकारी भोजन ताट (अमर्यादित)**<br>सॅलड<br>काजू पनीर मसाला<br>मिक्स व्हेज<br>स्वीट डिश (गुलाबजामून)<br>पुरी / चपाती<br>डाळ तडका<br>जिरा राईस<br>पापड<br>चहा किंवा कॉफी (कर्मचारी यांचे मागणीप्रमाणे)<br>पाणी बॉटल २५० मिली / पिण्याच्या पाण्याचे जार आणि ग्लास | ०१ भोजन ताट | |

**कोटेशन नोटीस व नियम अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इच्छुक ठेकेदारांनी / पुरवठाधाराकांनी उपरोक्त नमूद केलेल्या साहित्य / कामाचे दर दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ यांचे नावे दिनांक - २२/०६/२०२६ ते २८/०६/२०२६ अखेर दुपारी ०३:०० वाजेपर्यंत जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ येथे सादर करावे.

२. पुरवठा धारकाने कोटेशन सोबत शॉप अॅक्ट नोंदणी दाखला, अद्यावत अन्न भेसळ प्रतिबंधक प्रमाणपत्र, पॅनकार्ड, आयकर भरत असलेबाबतचा मागील २ वर्षाचा पुरावा इ. कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

३. पुरवठा धारकाने आपले दर सर्व करासह व वाहतूक खर्चासह पोहोच देण्यात यावे.

४. कोटेशन नोटीसमधील नमूद स्पेसिफिकेशनुसार भोजनाचा पुरवठा स्वखर्चाने जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली व ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी येथे करावा लागेल.

५. पुरवठा आदेशानुसार दिलेल्या मुदतीत भोजनाचा पुरवठा न केलेस प्रतिदिनी रक्कम रुपये ५००/- विलंब शुल्क आकारणेत येवून त्याची देय बीलातून वसुली करणेत येईल.

६. मंजूर केलेले दर सदर भोजनाची व्यवस्था पूर्ण होईपर्यंत पुरवठाधरकावर बंधनकारक राहतील.

७. पुरवठा धारकास कोणत्याही प्रकारची भाववाढ / नुकसान भरपाई मिळणार नाही.

८. सिलबंद कोटेशन पाकिटावर नोटीस क्रमांक फर्म /कंपनीचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.

९. उशिरा आलेल्या व अपुऱ्या तसेच अटीयुक्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

१०. कोटेशन संपूर्ण प्रक्रियेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ) हे लवाद म्हणुन जो निर्णय देतील तो अंतिम राहील. जो उभयंतावर बंधनकारक राहील.

११. कोटेशन मंजूर दराने पुरवठाधारकाने कामकाज करून देण्यास अथवा साहित्याचा पुरवठा करणेस टाळाटाळ करणेस असमर्थता दर्शविलेस किंवा साहित्याचा पुरवठा अर्धवट केल्यास कोटेशन नोटीस मधील नमूद अटीचा भंग केल्यास संबंधित पुरवठाधारकाचा पुरवठा आदेश रद्द करणेत येईल व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.भांखस – प्र.क्र.८२/भाग III/उद्योग - ४ दि.१/१२/२०१६ नुसार त्यांचेवर विधिवत कार्यवाही करणेत येईल.

१२. सदरचे काम हे मुख्य कार्यकारी अधिकारी/ प्राचार्य जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली यांच्या सूचनेनुसार करावयाचे आहे.

१३. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांनी राखून ठेवला आहे.

१४. सदरची कोटेशन नोटीस संतपीठाचे www.santpithpcmc.com या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

(संदीप खोत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ